महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

====================================================================

जावक क्रमांक –१०/३०६१२०७ दिनांक :- १० फेब्रुवारी, २०२६

प्रसिद्धिपत्रक

# **म्हाडा पुणे मंडळातर्फे येत्या मार्चमध्ये सुमारे ३००० सदनिका विक्रीसाठी सोडत-** पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील

म्हाडा पुणे मंडळातर्फे ४१८६ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात ; २,१५,९६५ प्राप्त अर्जदारांमधून सोडत

मुंबई, दि. १० फेब्रुवारी, २०२६ :- गेल्या अडीच वर्षात पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे सुमारे २५ हजार परवडणारी घरे केवळ २० टक्के सर्वसमावेशक योजनेतून विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. म्हाडाचा पारदर्शक कारभार व दर्जेदार बांधकामामुळे जनतेचा म्हाडावरील विश्वास वृद्धिंगत होत असून ४१८६ घरांसाठी २,१५,९६५ प्राप्त अर्ज हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. सोडतीची सदर शृंखला पुढे चालू ठेवत म्हाडा पुणे मंडळातर्फे येत्या मार्चमध्ये सुमारे ३००० परवडणाऱ्या घरांच्या विक्रीसाठी सोडत काढण्यात येणार असल्याचे प्रतिपादन पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी आज केले.

म्हाडाचा विभागीय घटक पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व पीएमआरडीएसह सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील ४१८६ सदनिकांच्या विक्रीसाठी पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते आज पुणे जिल्हा परिषदेच्या मा. शरदचंद्र पवार सभागृहात संगणकीय सोडत काढण्यात आली. 'म्हाडा'चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरेंसिंग), पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. राहुल साकोरे आदी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील म्हणाले की, म्हाडा ही गृहनिर्माण क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेच्या घरांचे स्वप्न पूर्ण करणारी अग्रगण्य संस्था आहे. विविध उत्पन्न गटातील जनतेसाठी वाजवी किंमत उत्कृष्ट दर्जा असलेली घरे बांधण्यासाठी कार्यरत असणारी संस्था असा 'म्हाडा'चा नावलौकिक आहे. म्हाडा पुणे मंडळातर्फे शिरूर येथे ५७४ सदनिका व खराबवाडी येथे १९४ व्यापारी गाळे बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. ताथवडे येथील फेज-१ प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण झालेला आहे. त्यानुसार पुढील फेज-२ मधील ८० टक्के काम पूर्ण होवून लवकरच ७५० निवासी व अनिवासी गाळे सोडतीत समाविष्ट करण्यात येतील. २० टक्के सर्वसमावेशक योजनेतून काही घरे उपलब्ध होणार आहेत. म्हाळुंगे, सोलापूर, बारामती, पुरंदर येथेही गृहनिर्माण प्रकल्प उभारणीचे काम सुरू असल्याचे श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी सांगितले. म्हाडा पुणे मंडळाला कमाल जमीन धारणा कायद्याअंतर्गत शासनाकडून उपलब्ध झालेल्या चंदनगर खराडी येथील १५ गुंठे जमिनीवरील अतिक्रमण हटवण्यात आले आहे. म्हाडाच्या जुन्या वसाहतींच्या पुनर्विकासाठी व सर्वसामान्यांना अधिकाधिक परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत यासाठी म्हाडा पुणे मंडळ प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले. श्री. शिवाजीराव आढळराव पाटील पुढे म्हणाले की, २० टक्के सर्वसमावेशक योजनेच्या सोडतीतील विजेत्यांना बांधकाम व्यावसायिकांकडून वाढीव शुल्क आकारणीच्या तक्रारी प्राप्त झाल्यावर अनेक प्रकरणांमध्ये मध्यस्थी करून नियमानुसानुसार वाढीव शुल्क आकारणी रद्द करण्याचे निर्देश देत सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविल्याचे सांगितले. २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत यशस्वी अर्जदारांना इमारतीतील ५० टक्के पार्किंग उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. म्हाडा वसाहतीतील रहिवाशांचे प्रश्न सुटावेत यासाठी म्हाडा पुणे मंडळाच्या कार्यालयामध्ये दर गुरुवारी जनता दरबार कार्यक्रम घेण्यात येत असून या माध्यमातूनही सर्वसामान्यांचे प्रश्न सुटण्यास मदत होत आहे. अर्जदारांच्या विनंतीनुसार, काही तांत्रिक अडचणी व निवडणूक आचारसंहिता या कारणांमुळे अर्ज भरण्यासाठी दोनदा मुदतवाढ देण्यात आली. निवडणूक आचारसंहिता असल्याने सोडतीला विलंब झाला. सदर ऑनलाईन सोडत ही संपूर्णपणे

पारदर्शी असून  म्हाडाने कोणत्याही मध्यस्थ, एजंटची नेमणुक केलेली नसून संगणकीय सोडतीमध्ये कोणताही मानवी हस्तक्षेप होऊ शकत नसल्याचे श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी सांगितले.

श्री. अनिल वानखडे म्हणाले की, गेल्या अडीच वर्षातील म्हाडा पुणे मंडळाने काढलेली ही सातवी संगणकीय सोडत असून मंडळाने मोठ्या प्रमाणात परवडणारी घर उपलब्ध करून दिली आहेत. म्हाडा पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील व म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या प्रयत्नामुळे मंडळाला गृह बांधणीसाठी जमिनी उपलब्ध होत आहेत. म्हाडा पुणे मंडळाच्या माध्यमातून अशाच प्रकारे यापुढे देखील परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे श्री. अनिल वानखडे यांनी सांगितले.

श्री. राहुल साकोरे म्हणाले की, आजच्या सोडतीमधून विजेत्या अर्जदारांनी विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने म्हाडाकडे रकमेचा भरणा करणे गरजेचे असून अर्जदारास विजेती सदनिका स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचा निर्णय स्विकृतीपत्रात दिलेल्या मुदतीत घ्यावा लागणार आहे. म्हाडाच्या वतीने IHLMS २.० या नवीन सॉफ्टवेअर प्रणालीमुळे सामान्य नागरिकांना घरबसल्या वेबसाईट किंवा मोबाइल अपच्या माध्यमातून नोंदणी करणे, अर्ज भरणे व ऑनलाईन पेमेंट या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच या प्रक्रियेमध्ये अर्जदारांची पात्रता निश्चिती हि नोंदणीच्या वेळेला करण्यात आलेली आहे. काही विजयी उमेदवारांना प्रवर्गनिहाय कागदपत्रे सादर करण्याच्या अटीवर (Allowed with Condition) देकारपत्र देण्यात येईल. आपली प्रलंबित कागदपत्रे लवकरात लवकर ऑनलाइन पध्दतीने सादर केल्यानंतर देकारपत्राचे वितरण करणे सोईस्कर होईल. सोडतीनंतर सदर प्रक्रियेत लागणाऱ्या वेळेची बचत होते. सोडतीनंतर त्वरीत अर्जदारांना ऑनलाईन पद्धतीने पुढील देकार पत्र व इतर पत्रव्यवहार त्यांच्या लॉग इन आय डी वर पाठविला जाणार आहे. तसेच २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील रिक्त सदनिका या प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर सोडतीसाठी बुक माय होम या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करावा.

म्हाडाच्या अधिकृत समाज माध्यम व्यासपीठांवरून सोडतीचा कार्यक्रम सुमारे ९० हजार लोकांनी ऑनलाईन थेट घरबसल्या बघितला.

###

(स्वाक्षरीत/-)
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 10/3061207 Dt. 10 February 2026

## Press Release

**MHADA Pune Board to Launch 3,000-Flat Housing Lottery in March** – Pune Board Chariman Mr. Shivajirao Adhalrao Patil

Mumbai, February 10, 2026 - : The Pune Housing and Area Development Board, a unit of MHADA, will announce housing lottery for for the sale of around 3,000 flats in the month of March. The announcement was made by Mr. Shivajirao Adhalrao Patil, Chairman of the MHADA Pune Board, while conducting the computerised draw for 4,186 flats, reflecting MHADA’s continued commitment to making affordable housing accessible to citizens.

Over the past two and a half years, the Pune Board has made nearly 25,000 affordable homes available for sale, largely through the 20 per cent Inclusive Housing Scheme said Mr Patil and added that MHADA’s transparent functioning and quality construction have strengthened public confidence, as reflected in the overwhelming response of 2,15,965 applications received for 4,186 flats.

The computerised housing lottery for 4,186 flats from various housing projects located in Pune, Pimpri-Chinchwad Municipal Corporation area, PMRDA region, as well as Solapur, Kolhapur, and Sangli districts, was conducted today at the Sharadchandra Pawar Hall, Pune Zilla Parishad, in the presence of Mr. Shivajirao Adhalrao Patil. MHADA Deputy Chief Executive Officer Mr. Anil Wankhade participated through video conferencing, while Mr. Rahul Sakore, Chief Officer, Pune Board, along with other senior officials, was present.

Addressing the gathering, Mr. Patil said that MHADA is a leading institution working to fulfil the dream of home ownership for the common citizen by providing quality housing at reasonable prices across income groups. He informed that construction of 574 flats at Shirur and 194 commercial units at Kharabwadi is currently underway. The Phase-I project at Tathawade has been successfully completed, while 80 per cent of Phase-II work has also been completed. Consequently, 750 residential and non-residential units will soon be included in the upcoming lottery. Some flats will also be available under the 20 per cent Inclusive Housing Scheme. Housing projects are also in progress at Mhalunge, Solapur, Baramati, and Purandar, he added.

Mr. Patil further stated that encroachments on 15 gunthas of land at Chandannagar, Kharadi, received by the Pune Board under the Urban Land Ceiling Act, have been removed. He emphasised that the Pune Board continues to focus on the redevelopment of old MHADA colonies and increasing the supply of affordable housing.

On grievance redressal, Mr. Patil said that complaints received from beneficiaries of the 20 per cent Inclusive Housing Scheme regarding additional charges levied by developers were examined, and in several cases, unjustified charges were cancelled through regulatory intervention. As per rules, beneficiaries under this scheme must be provided 50 per cent parking facilities within the building.

To address citizens’ concerns, the Pune Board conducts a Janata Darbar every Thursday, which has helped resolve public grievances. Application deadlines for the lottery were extended twice due to technical issues and enforcement of the Model Code of Conduct, which also resulted in a delay in conducting the draw. Mr. Patil reiterated that the entire online lottery process is fully transparent, with no involvement of agents or intermediaries and no scope for human intervention.

Deputy Chief Executive Officer Mr. Anil Wankhade stated that this was the seventh computerised lottery conducted by the Pune Board in the last two and a half years, during which a large number of affordable homes have been made available. He added that efforts are ongoing to secure land for housing construction so that similar initiatives can continue in the future.

Chief Officer Mr. Rahul Sakore informed that successful applicants must make payments to MHADA online within the prescribed timeframe and decide on acceptance or rejection of the allotted flat within the period mentioned in the allotment letter. Through the IHLMS 2.0 software system, citizens can register, apply, and make online payments conveniently via the website or mobile application, with eligibility verified at the time of registration. Some applicants may receive allotment letters under "Allowed with Condition", subject to submission of pending category-specific documents online. All post-lottery communications will be issued digitally through applicants' login IDs.

Vacant flats under the 20 per cent Inclusive Housing Scheme will be allotted on a first-come, first-served basis through MHADA's official website "Book My Home."

The live webcast of the lottery event was viewed by nearly 90,000 citizens through MHADA's official social media platforms.

###

(Sd/-)

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / MHADA

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

================================================================

Outward No. : 10/3061207 Dt. 10 February 2026

**प्रेस विज्ञप्ति**

**म्हाडा पुणे मंडल द्वारा आगामी मार्च माह में लगभग 3,000 सदनिकाएँ बिक्री हेतु लॉटरी के माध्यम से उपलब्ध कराई जाएंगी –** पुणे मंडल के सभापति श्री शिवाजीराव आढळराव पाटील

म्हाडा पुणे मंडल द्वारा 4,186 सदनिकाओं की बिक्री हेतु संगणकीय लॉटरी उत्साहपूर्वक संपन्न; 2,15,965 प्राप्त आवेदनों में से लॉटरी आयोजित

मुंबई, दिनांक 10 फरवरी, 2026 :- पिछले ढाई वर्षों में पुणे आवास एवं क्षेत्र विकास मंडल द्वारा केवल 20 प्रतिशत समावेशी आवास योजना के अंतर्गत लगभग 25,000 किफायती घर बिक्री हेतु उपलब्ध कराए गए हैं। म्हाडा की पारदर्शी कार्यप्रणाली और गुणवत्तापूर्ण निर्माण के कारण जनता का विश्वास और अधिक मजबूत हुआ है, जिसका उत्तम उदाहरण 4,186 घरों के लिए प्राप्त 2,15,965 आवेदन हैं। लॉटरी की इस श्रृंखला को आगे बढ़ाते हुए, म्हाडा पुणे मंडल द्वारा आगामी मार्च माह में लगभग 3,000 किफायती घरों की बिक्री हेतु लॉटरी निकाली जाएगी, ऐसा प्रतिपादन पुणे मंडल के सभापति श्री शिवाजीराव आढळराव पाटील ने आज किया।

म्हाडा की क्षेत्रीय इकाई पुणे आवास एवं क्षेत्र विकास मंडल द्वारा पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका एवं पीएमआरडीए क्षेत्र सहित सोलापुर, कोल्हापुर और सांगली जिलों के विभिन्न आवासीय परियोजनाओं की 4,186 सदनिकाओं की बिक्री हेतु आज पुणे जिला परिषद के मा. शरदचंद्र पवार सभागृह में पुणे मंडल के सभापति श्री शिवाजीराव आढळराव पाटील के कर-कमलों द्वारा संगणकीय लॉटरी संपन्न हुई। इस अवसर पर म्हाडा के उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अनिल वानखडे दूरदृश्य प्रणाली (वीडियो कॉन्फ्रेंसिंग) के माध्यम से तथा पुणे मंडल के मुख्य अधिकारी श्री राहुल साकोरे सहित अन्य अधिकारी उपस्थित थे।

पुणे मंडल के सभापति श्री शिवाजीराव आढळराव पाटील ने कहा कि, म्हाडा आवास क्षेत्र में आम जनता के घर का सपना साकार करने वाली एक अग्रणी संस्था है। विभिन्न आय वर्गों के लिए उचित मूल्य पर उत्कृष्ट गुणवत्ता वाले घरों का निर्माण करने वाली संस्था के रूप में म्हाडा की ख्याति है। म्हाडा पुणे मंडल द्वारा शिरूर में 574 सदनिकाओं तथा खराबवाडी में 194 व्यावसायिक गालों का निर्माण कार्य प्रगति पर है। ताथवडे स्थित फेज-1 परियोजना सफलतापूर्वक पूर्ण हो चुकी है। इसके अनुसार फेज-2 का 80 प्रतिशत कार्य पूर्ण हो चुका है और शीघ्र ही 750 आवासीय एवं अनिवासी गाले लॉटरी में सम्मिलित किए जाएंगे। 20 प्रतिशत समावेशी आवास योजना के अंतर्गत भी कुछ घर उपलब्ध कराए जाएंगे। म्हालुंगे, सोलापुर, बारामती और पुरंदर में भी आवासीय परियोजनाओं का निर्माण कार्य प्रगति पर है, ऐसा श्री शिवाजीराव आढळराव पाटील ने बताया। शासकीय भूमि सीमा अधिनियम के अंतर्गत शासन द्वारा उपलब्ध कराई गई चंदननगर, खराडी स्थित 15 गुंठे भूमि से अतिक्रमण हटाया गया है। म्हाडा की पुरानी कॉलोनियों के पुनर्विकास तथा आम जनता के लिए अधिक से अधिक किफायती घर उपलब्ध कराने हेतु म्हाडा पुणे मंडल निरंतर प्रयासरत है, ऐसा उन्होंने कहा।

श्री शिवाजीराव आढळराव पाटील ने आगे बताया कि, 20 प्रतिशत समावेशी आवास योजना की लॉटरी में विजेता लाभार्थियों से कुछ निर्माण व्यवसायियों द्वारा अतिरिक्त शुल्क वसूलने की शिकायतें प्राप्त होने पर, कई प्रकरणों में मध्यस्थता कर नियमों के अनुसार ऐसे अतिरिक्त शुल्क रद्द करने के निर्देश दिए गए, जिससे आम नागरिकों की समस्याओं का समाधान हुआ। 20 प्रतिशत समावेशी आवास योजना के अंतर्गत सफल आवेदकों को इमारत में 50 प्रतिशत पार्किंग सुविधा उपलब्ध कराना अनिवार्य है। म्हाडा वसाहतियों में निवासियों की समस्याओं के समाधान हेतु म्हाडा पुणे मंडल कार्यालय में प्रत्येक गुरुवार को जनता दरबार कार्यक्रम आयोजित किया जाता है, जिससे भी आम जनता की समस्याओं के समाधान में सहायता मिल रही है। आवेदकों के अनुरोध पर, कुछ तकनीकी कारणों एवं चुनाव आचार संहिता के चलते आवेदन भरने की अवधि दो बार बढ़ाई गई। चुनाव आचार संहिता के कारण लॉटरी में विलंब हुआ। यह ऑनलाइन लॉटरी प्रक्रिया पूर्णतः पारदर्शी है तथा म्हाडा द्वारा किसी भी मध्यस्थ या एजेंट की नियुक्ति नहीं की गई है। संगणकीय लॉटरी में किसी भी प्रकार के मानवीय हस्तक्षेप की कोई संभावना नहीं है, ऐसा श्री शिवाजीराव आढळराव पाटील ने स्पष्ट किया।

श्री अनिल वानखडे ने कहा कि, पिछले ढाई वर्षों में म्हाडा पुणे मंडल द्वारा निकाली गई यह सातवीं संगणकीय लॉटरी है तथा इस अवधि में मंडल द्वारा बड़ी संख्या में किफायती घर उपलब्ध कराए गए हैं। पुणे मंडल के अध्यक्ष श्री शिवाजीराव आढळराव पाटील एवं म्हाडा अधिकारियों के प्रयासों से मंडल को गृह निर्माण हेतु भूमि उपलब्ध हो रही

है। आगे भी इसी प्रकार किफायती घर उपलब्ध कराने हेतु म्हाडा पुणे मंडल प्रयासरत रहेगा, ऐसा श्री अनिल वानखडे ने कहा।

श्री राहुल साकोरे ने बताया कि, आज की लॉटरी में सफल आवेदकों को निर्धारित अवधि के भीतर ऑनलाइन माध्यम से म्हाडा को राशि का भुगतान करना अनिवार्य है तथा आवंटित सदनिका को स्वीकार अथवा अस्वीकार करने का निर्णय स्वीकृति पत्र में उल्लिखित समयावधि में लेना आवश्यक होगा। म्हाडा की ओर से IHLMS 2.0 इस नई सॉफ्टवेयर प्रणाली के माध्यम से नागरिकों को घर बैठे वेबसाइट अथवा मोबाइल ऐप के जरिए पंजीकरण, आवेदन भरने एवं ऑनलाइन भुगतान की सुविधा उपलब्ध कराई गई है। इस प्रक्रिया में आवेदकों की पात्रता की जांच पंजीकरण के समय ही की जाती है। कुछ सफल आवेदकों को प्रवर्गनिहाय दस्तावेज प्रस्तुत करने की शर्त पर (Allowed with Condition) आवंटन पत्र जारी किए जाएंगे। लंबित दस्तावेज शीघ्र ऑनलाइन प्रस्तुत करने पर आवंटन पत्रों का वितरण सुगम होगा। इससे लॉटरी पश्चात की प्रक्रिया में लगने वाले समय की बचत होती है। लॉटरी के पश्चात आगे के आवंटन पत्र एवं अन्य पत्राचार आवेदकों के लॉग-इन आईडी पर ऑनलाइन माध्यम से तुरंत भेजे जाएंगे। 20 प्रतिशत समावेशी आवास योजना के अंतर्गत रिक्त सदनिकाएँ 'पहले आओ–पहले पाओ' के सिद्धांत पर उपलब्ध कराई जाएंगी, जिसके लिए 'बुक माय होम' म्हाडा की अधिकृत वेबसाइट पर आवेदन करना होगा।

म्हाडा के आधिकारिक सोशल मीडिया मंचों के माध्यम से लगभग 90,000 लोगों ने घर बैठे ऑनलाइन लाइव लॉटरी कार्यक्रम देखा।

###

(स्वाक्षरीत/-)
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


Maharashtra Housing and Area Developement Authority
10 Feb 2026, 12:18 PM
PB25_SEP - 20 PERCENT
म्हाडा
MHADA

